**सभेची नोटीस**

जा.क्र.जिपसा/पशुसं/प्रशासन/**सभा-५१**/२०१५
पशुसंवर्धन विभाग
सातारा जिल्हा परिषद,सातारा
दिनांक ०९/११/२०१५

याव्दारे श्री./सौ./कु./श्रीमती.------------------------------------------------------------------

रा.--------------------------------- पो.----------------------------- ता.---------------------

जि.सातारा पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती सदस्य जिल्हा परिषद सातारा यांना कळविणेत येते की, **पशुसंवर्धन व दुग्धशाळा समितीची सर्वसाधारण सभा दि.१९/११/२०१५ रोजी दुपारी १-०० वाजता, कृषि समिती सभागृह तिसरा मजला, जिल्हा परिषद मुख्यालय, सातारा** येथे सोबतच्या जोडपत्रात उल्लेखिलेले कामकाज चालविणेसाठी भरविणेत येणार आहे. तरी सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

सचिव
पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती
सातारा जिल्हा परिषद,सातारा

**प्रत - माहितीसाठी सविनय सादर**

१.मा.अध्यक्ष/मा.उपाध्यक्ष, सातारा जिल्हा परिषद,सातारा
२.मा.सभापती, विषय समिती (सर्व), सातारा जिल्हा परिषद,सातारा
३.मा.मुख्य कार्यकारी अधिकारी/मा.अति.मुख्य कार्यकारी अधिकारी, सातारा जिल्हा परिषद, सातारा
४.मा.स्थायी समिती सदस्य, (सर्व), सातारा जिल्हा परिषद,सातारा
५.मा.सभापती, पंचायत समिती (सर्व) -----------------------------------------------------
६.मा.जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, गोडोली, सातारा
७.मा.सर्व खाते प्रमुख, सातारा जिल्हा परिषद,सातारा -------------------------------------------
८.गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व) ----------------------------------------------

**प्रत - माहितीसाठी व सभेस अद्यावत माहितीसह उपस्थित राहणेसाठी**

१.कार्यकारी अभियंता, बांधकाम उत्तर विभाग, सातारा जिल्हा परिषद,सातारा
२.कार्यकारी अभियंता, बांधकाम दक्षिण विभाग, सातारा जिल्हा परिषद,सातारा
३.जिल्हा दुग्ध विकास अधिकारी, एम.आय.डी.सी., सातारा
४.पशुधन विकास अधिकारी (तांत्रिक सहाय्यक), सातारा जिल्हा परिषद,सातारा
५.पशुधन विकास अधिकारी (मोबाईल), सातारा जिल्हा परिषद,सातारा
६.पशुधन विकास अधिकारी, सधन कुक्कुट विकास गट, गोडोली, सातारा
७.पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समिती (सर्व) -------------------------------
८.स्वीय सहाय्यक, मा.सभापती, पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती, सातारा जिल्हा परिषद,सातारा
९.सहाय्यक प्रशासन अधिकारी, पशुसंवर्धन विभाग, सातारा जिल्हा परिषद,सातारा
१०.कनिष्ठ प्रशासन अधिकारी, पशुसंवर्धन विभाग, सातारा जिल्हा परिषद,सातारा
११.वरिष्ठ सहाय्यक (प्रशासन), आस्थापना-२, पशुसंवर्धन विभाग, सातारा जिल्हा परिषद,सातारा
१२.कनिष्ठ सहाय्यक (प्रशासन), आस्थापना-१, पशुसंवर्धन विभाग, सातारा जिल्हा परिषद,सातारा
१३.कनिष्ठ सहाय्यक (लेखा), पशुसंवर्धन विभाग, सातारा जिल्हा परिषद,सातारा
१४.कनिष्ठ सहाय्यक (प्रशासन), पशुसंवर्धन विभाग, सातारा जिल्हा परिषद,सातारा
१५.पशुधन पर्यवेक्षक, तांत्रिक शाखा, पशुसंवर्धन विभाग, सातारा जिल्हा परिषद,सातारा

# जोडपत्र

## विषयसूची

विषय क्र.१ :- दिनांकं २१/१०/२०१५ रोजी झालेल्या पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२ :- दिनांक २१/१०/२०१५ रोजी झालेल्या पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती सभेमध्ये मंजूर करण्यात आलेल्या ठरावावर केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेणेबाबत विचार करणे.

विषय क्र.३ :- महाराष्ट्र शासनाकडून आलेले शासन निर्णय/परिपत्रके यांचे वाचन करणे.

विषय क्र.४ :- सन २०१५-१६ मधील माहे ऑक्टोबर २०१५ अखेर झालेल्या योजनाअंतर्गत योजना/योजनेत्तर योजना व जि.प.सेस योजनांवर झालेल्या खर्चाचा आढावा घेऊन त्यास महाराष्ट्र जि.प.व पं.स.अधिनियम १९६१ मधील कलम ९(४) नुसार मंजूरी देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.५ :- केंद्र पुरस्कत लाळ खुरकत, रोग नियंत्रण कार्यक्रम अंतर्गत सन २०१५-१६ अंतर्गत सन २०१५-१६ अंतर्गत उपलब्ध निधी र.रु.९.७० लक्ष मधून बाबवार खर्चास मान्यता देणेबाबत.

पशुसंवर्धन विभागाचा तालुका निहाय कामकाजाचा आढावा घेणे.

**या शिवाय मा.सभापती, पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती यांचे मान्यतेने व परवानगीने येणारे ऐनवेळचे विषय.**

**दिनांक-२१/१०/२०१५ रोजी दुपारी १.०० वाजता, कृषि समिती सभागृह, तिसरा मजला, जिल्हा परिषद मुख्यालय, सातारा येथे घेण्यात आलेल्या पशुसंवर्धन व दुग्धशाळा समितीच्या मासिक सर्वसाधारण सभेचा कार्यवृत्तांत.**

---

**उपस्थित सन्मा.सभासद सर्वश्री.**

| | |
|---|---|
| १. मा.श्री.शिवाजीराव तुकाराम शिंदे | सभापती |
| २. मा.श्री.सतिश नारायण धुमाळ | सभासद |
| ३. मा.श्री.संपतराव गणपतराव जाधव | सभासद |
| ४. मा.श्री.शिवाजी पांडुरंग गावडे | सभासद |
| ५. मा.श्री.जितेंद्र सर्जेराव सावंत | सभासद |
| ६. मा.श्री.अविनाश शंकर फाळके | सभासद |
| ७. मा.सौ.रोहिणी मोहन जंगम | सभासद |
| ८. मा.सौ.रुपाली नागेश जाधव | सभासद |
| ९. मा.सौ.कविता जयराम चव्हाण | सभासद |

---

येणेप्रमाणे सभासद उपस्थित झालेनंतर सन्मा. सभापती, कृषि, पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. तदनंतर खालीलप्रमाणे दुःखवटयाचा ठराव मांडला.

**दुःखवटयाचा ठराव**

राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जेष्ट नेते, माजी विधान परिषद सदस्य सदाशिवराव पोळ बुधवार दि.३०/०९/२०१५ रोजी दुःखद निधन झाले. स्व.सदाशिवराव पोळ हे तात्या हया नांवाने जिल्हयात परिचीत होते. सन १९६७ ते २००२ या कालावधीत ते जिल्हा परिषद सभागृहाचे सदस्य होते. त्यांनी प्रदीर्घ राजकिय कारकिर्दीत माण पंचायत समितीचे सभापती, सातारा जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष, सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादीत, साताराचे चेअरमन व व्हाईस चेअरमन, विधान परिषद सदस्य इत्यादी पदे भूषविली आहेत.

राजकारण, समाजकारण, शिक्षण व सहकार क्षेत्रातही त्यांनी मोठे योगदान दिलेले आहे. त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात ही सभा सहभागी होत आहे. सभागृहाने दोन मिनिटे स्तब्धता पाळून दिवंगतास श्रध्दांजली अर्पण केली.

**ईश्वर दिवंगताचे आत्म्यास शांती व सद्गती देवो**

यानंतर सन्मा.सभापती यांच्या मान्यतेने सभेचे विषय पत्रिकेवरील कामकाजास सुरुवात झाली.

विषय क्र.१ :- दिनांक २३/०९/२०१५ रोजी झालेल्या पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती सभेचा कार्यवृत्तांत वाचुन कायम करणे बाबत विचार करणे.

ठराव क्र.२९२ :- दिनांक २३/०९/२०१५ रोजी झालेल्या पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती सभेचा कार्यवृत्तांत वाचुन दाखविणेत आला. दिनांक २३/०९/२०१५ चा कार्यवृत्तांत कायम करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सुचक :- मा.श्री.संपतराव गणपतराव जाधव
अनुमोदकः- मा.श्री.सतिश नारायण धुमाळ
ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्र.२ :- दिनांक २३/०९/२०१५ रोजी झालेल्या पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती सभेमध्ये मंजूर करण्यात आलेल्या ठरावावर केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेणेबाबत विचार करणे.

ठराव क्र.२९३ :- दिनांक २३/०९/२०१५ रोजी झालेल्या पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती सभेमध्ये मंजूर करण्यात आलेल्या ठरावावर केलेल्या कार्यवाहीचा आढावा नोंदवहीवरुन घेणेत येवून त्यास सर्वानुमते मान्यता देणेत आली.

सूचक :- मा.सौ.रुपाली नागेश जाधव
अनुमोदकः- मा.श्री.जितेंद्र सर्जेराव सावंत
ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्र.३ :- महाराष्ट्र शासनाकडून आलेले शासन निर्णय/परिपत्रके यांचे वाचन करणे.
ठराव क्र.२९४ :- महाराष्ट्र शासनाकडून शासन निर्णय/परिपत्रके माहे सप्टेंबर २०१५ मध्ये प्राप्त झालेली नसलेने तशी नोंद घेणेत आली.

सूचक :- मा.श्री.जितेंद्र सर्जेराव सावंत
अनुमोदकः- मा.श्री.सतिश नारायण धुमाळ
ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्र.४ :- सन २०१५-१६ मधील माहे सप्टेंबर २०१५ अखेर झालेल्या योजनाअंतर्गत योजना/योजनेत्तर योजना व जि.प.सेस योजनांवर झालेल्या खर्चाचा आढावा घेऊन त्यास महाराष्ट्र जि.प.व पं.स.अधिनियम १९६१ मधील कलम ९(४) नुसार मंजूरी देणेबाबत विचार करणे.
ठराव क्र.२९५ :- सन २०१५-१६ मधील माहे सप्टेंबर २०१५ अखेर झालेल्या योजनांतर्गत योजना/योजनेत्तर योजना व जि.प.सेस योजनांवर झालेल्या खर्चाचा आढावा घेवून त्यास महाराष्ट्र जि.प.व पं.स.अधिनियम १९६१ मधील कलम ९(४) नुसार मंजूरी देणेत आली.

सूचक :- मा.श्री.सतिश नारायण धुमाळ
अनुमोदकः- मा.सौ.कविता जयराम चव्हाण
ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्र.५ :- पशुसंवर्धन विभाग,जिल्हा परिषद सातारा च्या माहे जुलै २०१५ ते सप्टेंबर २०१५ या तिमाहीच्या कालावधीत सर्व प्रशासकिय व लेखा विषयक नोंदवहया सर्वार्थाने पूर्ण असलेबाबत त्याचे अवलोकन करुन तसा अभिप्राय देणे.
ठराव क्र.२९६ :- पशुसंवर्धन विभाग,जिल्हा परिषद साताराच्या माहे जुलै २०१५ ते सप्टेंबर २०१५ या तिमाहीच्या कालावधीतील सर्व प्रशासकीय व लेखा विषयक नोंदवहया सर्वार्थाने पुर्ण असलेबाबत महाराष्ट्र जि.प.व पं.स.लेखांसंहिता १९६८ नुसार पंचायत समितीचे १० व्या अहवालातील परिच्छेद क्र.३३ मधील सुचनेनुसार परिपूर्ण असलेबाबतचा अहवाल सर्वानुमते देण्यात आला.

सूचक :- मा.श्री.सतिश नारायण धुमाळ
अनुमोदकः- मा.सौ.कविता जयराम चव्हाण
ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्र.६ :- केंद्र पुरस्कृत अस्कॅड योजना सन २०१४-१५ अंतर्गत उपलब्ध असलेल्या तरतूद र.रु.२.८० लक्ष च्या खर्चास मान्यता देणेबाबत.
ठराव क्र.२९७ :- केंद्र पुरस्कृत अस्कॅड योजना सन २०१४-१५ अंतर्गत उपलब्ध असलेल्या तरतूद र.रु.२.८० लक्ष च्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सुचक :- मा.श्री.संपतराव गणपतराव जाधव
अनुमोदकः- मा.श्री.सतिश नारायण धुमाळ
ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्र.७ :- पशुवैद्यकिय दवाखाना श्रेणी-२, मार्ली ता.जावली या संस्थेच्या इमारत दुरुस्तीच्या र.रु.२.१६ लक्ष च्या खर्चास मान्यता देणेबाबत.
ठराव क्र.२९८ :- पशुवैद्यकिय दवाखाना श्रेणी-२, मार्ली ता.जावली या संस्थेच्या इमारत दुरुस्तीच्या र.रु.२.१६ लक्ष च्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सूचक :- मा.सौ.रुपाली नागेश जाधव
अनुमोदकः- मा.श्री.जितेंद्र सर्जेराव सावंत
ठराव सर्वानुमते मंजूर

ऐनवेळचा विषय क्र.१ :- जिल्हा परिषद मार्फत नियोजित कृषि औद्योगिक व पशुपक्षी प्रदर्शनासाठी जि.प.सेस सन २०१५-१६ अंतर्गत मेळावे व प्रदर्शने या शिर्षकाखालील तरतूद र.रु.४.५० लक्ष मधून जातीवंत जनावरांना बक्षीस वितरण, वाहतूक प्रदर्शन स्टॉलसाठी आवश्यक साधन सामुग्री प्रदर्शनातील जनावरांना खाद्य व वैरणीची सुविधा इत्यादी बाबींसाठी खर्चास मान्यता देणेबाबत.

ठराव क्र.२९९ :- जिल्हा परिषद मार्फत नियोजित कृषि औद्योगिक व पशुपक्षी प्रदर्शनासाठी जि.प.सेस सन २०१५-१६ अंतर्गत मेळावे व प्रदर्शने या शिर्षकाखालील तरतूद र.रु.४.५० लक्ष मधून जातीवंत जनावरांना बक्षीस वितरण, वाहतूक प्रदर्शन स्टॉलसाठी आवश्यक साधन सामुग्री प्रदर्शनातील जनावरांना खाद्य व वैरणीची सुविधा इत्यादी बाबींसाठी खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सूचक :- मा.श्री.सतिश नारायण धुमाळ
अनुमोदकः- मा.श्री.जितेंद्र सर्जेराव सावंत
ठराव सर्वानुमते मंजूर

ऐनवेळचा विषय क्र.२ :- पशुसंवर्धन विभाग, सातारा जिल्हा परिषद, सातारा अंतर्गत सधन कुक्कुट विकास गट, गोडोली, सातारा येथे अंडी विक्री, पक्षी विक्री, खत विक्री, बारदाणा विक्री इत्यादी पासून मिळणारी रककम चलनाने शासनाकडे भरणा करणेत येते. सदरचे रक्कमेचा विनियोग सधन कुक्कुट विकास गट, गोडोली, सातारा चे विकासासाठी करणेबाबत शासनास शिफारस करणे.

ठराव क्र.३०० :- पशुसंवर्धन विभाग, सातारा जिल्हा परिषद, सातारा अंतर्गत सधन कुक्कुट विकास गट, गोडोली, सातारा येथे अंडी विक्री, पक्षी विक्री, खत विक्री, बारदाणा विक्री इत्यादी पासून मिळणारी रककम चलनाने शासनाकडे भरणा करणेत येते. सदरचे रक्कमेचा विनियोग सधन कुक्कुट विकास गट, गोडोली, सातारा चे विकासासाठी केलेस सधन कुक्कुट गट, खाजगी संस्थेच्या कुक्कुट गटासारखे सक्षम निश्चितपणे होतील. कुक्कुट गट व्यावसायीक दृष्टीने किफ़ायतशीर होतील. तरी याचा शासन स्तरावर विचार होऊन याबाबत आवश्यक ते आदेश निर्गमीत व्हावेत यासाठी ही सभा शासनास शिफारस करीत आहे.

सुचक :- मा.श्री.संपतराव गणपतराव जाधव
अनुमोदकः- मा.श्री.सतिश नारायण धुमाळ
ठराव सर्वानुमते मंजूर

यानंतर पशुसंवर्धन विभागाचा तालुका निहांय कामकाजाचा आढावा पशुधन विकास अधिकारी (विस्तार),पंचायत समिती यांनी सभेपुढे सादर केला. वरील प्रमाणे सर्वांकष चर्चा होऊन विषय पत्रिकेवरील विषय संपल्याने मा.सन्मा.सभापती यांचे वतीने सचिव डॉ.आर.डी.कदम, यांनी उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

| | |
|---|---|
| सही/--- | सही/--- |
| (डॉ.आर.डी.कदम) | (शि.तु.शिंदे) |
| सचिव | सभापती |
| पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती | पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती |
| सातारा जिल्हा परिषद,सातारा | सातारा जिल्हा परिषद,सातारा |

// खरी नक्कल //

सचिव
पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती
सातारा जिल्हा परिषद,सातारा

**सभेची नोटीस**

जा.क्र.जिपसा/पशुसं/प्रशासन/**सभा-५२**/२०१५
पशुसंवर्धन विभाग
सातारा जिल्हा परिषद,सातारा
दिनांक ०९/१२/२०१५

याव्दारे श्री./सौ./कु./श्रीमती.------------------------------------------------------------------

रा.--------------------------------- पो.------------------------------ ता.--------------------

जि.सातारा पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती सदस्य जिल्हा परिषद सातारा यांना कळविणेत येते की, **पशुसंवर्धन व दुग्धशाळा समितीची सर्वसाधारण सभा दि.१७/१२/२०१५ रोजी दुपारी १-०० वाजता, कृषि समिती सभागृह तिसरा मजला, जिल्हा परिषद मुख्यालय, सातारा** येथे सोबतच्या जोडपत्रात उल्लेखिलेले कामकाज चालविणेसाठी भरविणेत येणार आहे. तरी सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

सचिव
पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती
सातारा जिल्हा परिषद,सातारा

**प्रत - माहितीसाठी सविनय सादर**

१.मा.अध्यक्ष/मा.उपाध्यक्ष, सातारा जिल्हा परिषद,सातारा
२.मा.सभापती, विषय समिती (सर्व), सातारा जिल्हा परिषद,सातारा
३.मा.मुख्य कार्यकारी अधिकारी/मा.अति.मुख्य कार्यकारी अधिकारी, सातारा जिल्हा परिषद, सातारा
४.मा.स्थायी समिती सदस्य, (सर्व), सातारा जिल्हा परिषद,सातारा
५.मा.सभापती, पंचायत समिती (सर्व) ------------------------------------------------------
६.मा.जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, गोडोली, सातारा
७.मा.सर्व खाते प्रमुख, सातारा जिल्हा परिषद,सातारा ---------------------------------------------
८.गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व) ----------------------------------------------

**प्रत - माहितीसाठी व सभेस अद्यावत माहितीसह उपस्थित राहणेसाठी**

१.कार्यकारी अभियंता, बांधकाम उत्तर विभाग, सातारा जिल्हा परिषद,सातारा
२.कार्यकारी अभियंता, बांधकाम दक्षिण विभाग, सातारा जिल्हा परिषद,सातारा
३.जिल्हा दुग्ध विकास अधिकारी, एम.आय.डी.सी., सातारा
४.पशुधन विकास अधिकारी (तांत्रिक सहाय्यक), सातारा जिल्हा परिषद,सातारा
५.पशुधन विकास अधिकारी (मोबाईल), सातारा जिल्हा परिषद,सातारा
६.पशुधन विकास अधिकारी, सधन कुक्कुट विकास गट, गोडोली, सातारा
७.पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समिती (सर्व) --------------------------------
८.स्वीय सहाय्यक, मा.सभापती, पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती, सातारा जिल्हा परिषद,सातारा
९.सहाय्यक प्रशासन अधिकारी, पशुसंवर्धन विभाग, सातारा जिल्हा परिषद,सातारा
१०.कनिष्ठ प्रशासन अधिकारी, पशुसंवर्धन विभाग, सातारा जिल्हा परिषद,सातारा
११.वरिष्ठ सहाय्यक (प्रशासन), आस्थापना-२, पशुसंवर्धन विभाग, सातारा जिल्हा परिषद,सातारा
१२.कनिष्ठ सहाय्यक (प्रशासन), आस्थापना-१, पशुसंवर्धन विभाग, सातारा जिल्हा परिषद,सातारा
१३.कनिष्ठ सहाय्यक (लेखा), पशुसंवर्धन विभाग, सातारा जिल्हा परिषद,सातारा
१४.कनिष्ठ सहाय्यक (प्रशासन), पशुसंवर्धन विभाग, सातारा जिल्हा परिषद,सातारा
१५.पशुधन पर्यवेक्षक, तांत्रिक शाखा, पशुसंवर्धन विभाग, सातारा जिल्हा परिषद,सातारा

# <u>जोडपत्र</u>

## विषयसूची

विषय क्र.१ :- दिनांक १९/११/२०१५ रोजी झालेल्या पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२ :- दिनांक १९/११/२०१५ रोजी झालेल्या पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती सभेमध्ये मंजूर करण्यात आलेल्या ठरावावर केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेणेबाबत विचार करणे.

विषय क्र.३ :- महाराष्ट्र शासनाकडून आलेले शासन निर्णय/परिपत्रके यांचे वाचन करणे.

विषय क्र.४ :- सन २०१५-१६ मधील माहे नोव्हेंबर २०१५ अखेर झालेल्या योजनाअंतर्गत योजना/योजनेत्तर योजना व जि.प.सेस योजनांवर झालेल्या खर्चाचा आढावा घेऊन त्यास महाराष्ट्र जि.प.व पं.स.अधिनियम १९६१ मधील कलम ९(४) नुसार मंजूरी देणेबाबत विचार करणे.

पशुसंवर्धन विभागाचा तालुका निहाय कामकाजाचा आढावा घेणे.

**या शिवाय मा.सभापती, पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती यांचे मान्यतेने व परवानगीने येणारे ऐनवेळचे विषय.**

**दिनांक-१९/११/२०१५ रोजी दुपारी १.०० वाजता, कृषि समिती सभागृह, तिसरा मजला, जिल्हा परिषद मुख्यालय, सातारा येथे घेण्यात आलेल्या पशुसंवर्धन व दुग्धशाळा समितीच्या मासिक सर्वसाधारण सभेचा कार्यवृत्तांत.**

---

**उपस्थित सन्मा.सभासद सर्वश्री.**

| | |
|---|---|
| १. मा.श्री.शिवाजीराव तुकाराम शिंदे | सभापती |
| २. मा.श्री.संपतराव गणपतराव जाधव | सभासद |
| ३. मा.श्री.शिवाजी पांडुरंग गावडे | सभासद |
| ४. मा.श्री.जितेंद्र सर्जेराव सावंत | सभासद |
| ५. मा.श्री.अविनाश शंकर फाळके | सभासद |
| ६. मा.सौ.रोहिणी मोहन जंगम | सभासद |
| ७. मा.सौ.रुपाली नागेश जाधव | सभासद |
| ८. मा.सौ.कविता जयराम चव्हाण | सभासद |

---

येणेप्रमाणे सभासद उपस्थित झालेनंतर सन्मा. सभापती, कृषि, पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. तदनंतर खालीलप्रमाणे दुःखवटयाचे ठराव मांडले.

**दुःखवटयाचा ठराव**

१ खटाव तालुक्याचे माजी आमदार केशवराव पाटील यांच्या पत्नी गौराताई केशवराव पाटील यांचे दि.२३/१०/२०१५ रोजी दुःखद निधन झाले. पाटील यांचे कुटुंबीयांचे दुःखात ही सभा सहभागी होत आहे.

**ईश्वर दिवंगताचे आत्म्यास शांती व सद्‌गती देवो**

२ जिल्हा परिषदेच्या शिक्षण व अर्थ समितीचे माजी सभापती श्री.पतंगराव माने यांचे वडील आनंदराव माने यांचे दि.२९/१०/२०१५ रोजी दुःखद निधन झाले. माने यांचे कुटुंबीयांचे दुःखात ही सभा सहभागी होत आहे.

**ईश्वर दिवंगताचे आत्म्यास शांती व सद्‌गती देवो**

३ संतोष मधुकर घोरपडे (महाडीक) मु.पो.पोगरवाडी ता.सातारा सध्या रा.गोडोली ता.जि.सातारा यांचा जन्म दिनांक १५/०१/१९७८ रोजी पोगरवाडी या छोटयाश्या गांवात झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण जितामाता प्रॅक्टीसींग हायस्कुल,सातारा येथे तसेच माध्यमिक शिक्षण सैनिक स्कुल,सातारा व महाविद्यालयीन शिक्षण यशवंतराव चव्हाण महाविद्यालय,सातारा येथे घेवून ते १९९९ मध्ये डिफेन्स मध्ये भरती झाले. व १९९७ मध्ये आर्मी प्रशिक्षण प्रारंभ ते सध्या ४१ राष्ट्रीय रायफलमध्ये कमांडीग ऑफिसर कर्नल म्हणून कार्यरत होते. त्यांचे दि.१७/११/२०१५ रोजी जम्मु काश्मिर मधील कुपवाड जिल्हयात दहशतवादयांचे हल्ल्यात निधन झाले. घोरपडे (महाडीक) यांचे कुटुंबीयांचे दुःखात ही सभा सहभागी होत आहे.

**ईश्वर दिवंगताचे आत्म्यास शांती व सद्‌गती देवो**

यानंतर सन्मा.सभापती यांच्या मान्यतेने सभेचे विषय पत्रिकेवरील कामकाजास सुरुवात झाली.

विषय क्र.१:- दिनांक २१/१०/२०१५ रोजी झालेल्या पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती सभेचा कार्यवृत्तांत वाचुन कायम करणे बाबत विचार करणे.

---

ठराव क्र.३०१ :- दिनांक २१/१०/२०१५ रोजी झालेल्या पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती सभेचा कार्यवृत्तांत वाचुन दाखविणेत आला. दिनांक २१/१०/२०१५ चा कार्यवृत्तांत कायम करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सुचक :- मा.श्री.संपतराव गणपतराव जाधव
अनुमोदकः- मा.श्री.जितेंद्र सर्जेराव सावंत
ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्र.२ :- दिनांक २१/१०/२०१५ रोजी झालेल्या पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती सभेमध्ये मंजूर करण्यात आलेल्या ठरावावर केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेणेबाबत विचार करणे.

ठराव क्र.३०२:- दिनांक २१/१०/२०१५ रोजी झालेल्या पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती सभेमध्ये मंजूर करण्यात आलेल्या ठरावावर केलेल्या कार्यवाहीचा आढावा नोंदवहीवरुन घेणेत येवून त्यास सर्वानुमते मान्यता देणेत आली.

सूचक :- मा.सौ.रुपाली नागेश जाधव
अनुमोदकः- मा.श्री.जितेंद्र सर्जेराव सावंत
ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्र.३ :- महाराष्ट्र शासनाकडून आलेले शासन निर्णय/परिपत्रके यांचे वाचन करणे.

ठराव क्र.३०३:- महाराष्ट्र शासनाकडून शासन निर्णय/परिपत्रके माहे सप्टेंबर २०१५ मध्ये प्राप्त झालेली नसलेने तशी नोंद घेणेत आली.

सूचक :- मा.श्री.जितेंद्र सर्जेराव सावंत
अनुमोदकः- मा.सौ.कविता जयराम चव्हाण
ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्र.४ :- सन २०१५-१६ मधील माहे ऑक्टोबर २०१५ अखेर झालेल्या योजनाअंतर्गत योजना/योजनेत्तर योजना व जि.प.सेस योजनांवर झालेल्या खर्चाचा आढावा घेऊन त्यास महाराष्ट्र जि.प.व पं.स.अधिनियम १९६१ मधील कलम ९(४) नुसार मंजूरी देणेबाबत विचार करणे.

ठराव क्र.३०४:- सन २०१५-१६ मधील माहे ऑक्टोबर २०१५ अखेर झालेल्या योजनांतर्गत योजना/योजनेत्तर योजना व जि.प.सेस योजनांवर झालेल्या खर्चाचा आढावा घेवून त्यास महाराष्ट्र जि.प.व पं.स.अधिनियम १९६१ मधील कलम ९(४) नुसार मंजूरी देणेत आली.

सूचक :- मा.श्री.संपतराव गणपतराव जाधव
अनुमोदकः- मा.सौ.कविता जयराम चव्हाण
ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्र.५ :- केंद्र पुरस्कत लाळ खुरकत, रोग नियंत्रण कार्यक्रम अंतर्गत सन २०१५-१६ अंतर्गत सन २०१५-१६ अंतर्गत उपलब्ध निधी र.रु.९.७० लक्ष मधून बाबवार खर्चास मान्यता देणेबाबत.

ठराव क्र.३०५:- केंद्र पुरस्कत लाळ खुरकत, रोग नियंत्रण कार्यक्रम अंतर्गत सन २०१५-१६ अंतर्गत सन २०१५-१६ अंतर्गत उपलब्ध निधी र.रु.९.७० लक्ष मधून बाबवार खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सूचक :- मा.सौ.रुपाली नागेश जाधव
अनुमोदकः- मा.सौ.कविता जयराम चव्हाण
ठराव सर्वानुमते मंजूर

ऐनवेळचा विषय क्र.१ :- जि.प.सेस अंतर्गत सर्वसाधारण लाभार्थींना ५० टक्के अनुदानावर शेळी गट पुरविणे योजनेखालील लाभार्थींच्या निवडीसाठी लाभार्थीचे वार्षिक उत्पन्न र.रु.२५,०००/- हून र.रु.५०,०००/- प्रतिवर्ष करणेबाबत.

ऐनवेळचा ठराव क्र.३०६ :- जि.प.सेस अंतर्गत सर्वसाधारण लाभार्थींस ५० टक्के अनुदानावर शेळी गट पुरविणे या योजनेखालील लाभार्थींची निवड करणेसाठी लाभार्थीचे वार्षिक उत्पन्न र.रु.२५,०००/- अशी अट आहे. परंतु सदर अटीमुळे र.रु.२५,०००/- वार्षिक उत्पन्न असलेल्या लाभार्थींची संख्या अतिशय कमी आहे. ग्राम विकास विभागाकडील शासन निर्णय क्र.झेडपीए-२०१३/प्र.क्र.७६/पंरा-१, दिनांक २४/०१/२०१४ अन्वये महिला व बाल विकास विभागाकडील लाभार्थींना र.रु.५०,०००/- वार्षिक उत्पन्नाची अट आहे. तसेच समाज कल्याण विभागाकडील वैयक्तिक लाभाचे योजनेसाठी उत्पन्नाची अट र.रु.५०,०००/- इतकी आहे. याच

धर्तीवर सर्वसाधारण शेळी गट वाटपाच्या लाभार्थींची वार्षिक उत्पन्नाची अट र.रु.५०,०००/- करणेस ही सभा शिफारस करीत आहे. त्यानुसार विभागाने कार्यवाही करावी.

सूचक :- मा.श्री.संपतराव गणपतराव जाधव
अनुमोदक:- मा.सौ.कविता जयराम चव्हाण
ठराव सर्वानुमते मंजूर

ऐनवेळचा विषय क्र.२ :- जि.प.सेस सन २०१५-१६ अंतर्गत सर्वसाधारण लाभार्थींना ५० टक्के अनुदानावर कडबाकुट्टी सयंत्र वाटप करणे या योजनेतील पात्र लाभार्थींची निवड करुन यादीस मान्यता देणेबाबत.

ऐनवेळचा ठराव क्र.३०७ :- जि.प.सेस सन २०१५-१६ अंतर्गत सर्वसाधारण लाभार्थींना ५० टक्के अनुदानावर कडबाकुट्टी सयंत्र वाटप करणे या योजनेतील पात्र लाभार्थींची निवड करुन यादीस मान्यता देणेत येत आहे.

सूचक :- मा.सौ.रुपाली नागेश जाधव
अनुमोदक:- मा.श्री.संपतराव गणपतराव जाधव
ठराव सर्वानुमते मंजूर

ऐनवेळचा विषय क्र.३ :- जि.प.सेस सन २०१५-१६ अंतर्गत सर्वसाधारण लाभार्थींना ५० टक्के अनुदानावर शेळी गट वाटप करणे या योजनेखालील पात्र लाभार्थींची निवड करुन यादीस मान्यता देणेबाबत.

ऐनवेळचा ठराव क्र.३०८ :- जि.प.सेस सन २०१५-१६ अंतर्गत सर्वसाधारण लाभार्थींना ५० टक्के अनुदानावर शेळी गट वाटप करणे या योजनेखालील पात्र लाभार्थींची निवड करुन यादीस मान्यता देणेत येत आहे.

सूचक :- मा.श्री.जितेंद्र सर्जेराव सावंत
अनुमोदक:- मा.सौ.कविता जयराम चव्हाण
ठराव सर्वानुमते मंजूर

यानंतर पशुसंवर्धन विभागाचा तालुका निहांय कामकाजाचा आढावा पशुधन विकास अधिकारी (विस्तार),पंचायत समिती यांनी सभेपुढे सादर केला. वरील प्रमाणे सर्वांकष चर्चा होऊन विषय पत्रिकेवरील विषय संपल्याने मा.सन्मा.सभापती यांचे वतीने सचिव डॉ.आर.डी.कदम, यांनी उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/---
(डॉ.आर.डी.कदम)
सचिव
पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती
सातारा जिल्हा परिषद,सातारा

सही/---
(शि.तु.शिंदे)
सभापती
पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती
सातारा जिल्हा परिषद,सातारा

// खरी नक्कल //

सचिव
पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती
सातारा जिल्हा परिषद,सातारा